जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७२ दिनांक - १९/०५/२०२३**

## खंडणी विरोधी पथक - २,गुन्हे शाखा,पुणे शहर

## व्यावसायिकाकडे ५ कोटी रुपयांची खंडणी मागणारे दोन इसमांना केले जेरबंद

यातील फिर्यादी यांची सॉफ्टवेअर कंपनी असुन,त्यांची बदनामी करण्याची भीती घालुन जीवे ठार मारण्याची धमकी देवुन आरोपी नामे महेश सौदागर हनमे,रा.राजेश्वरी नगर,उत्तर सोलापुर,जि.सोलापुर याने ३ लाख ८० हजार रुपये स्विकारुन आणखी ५ कोटी रुपयांची मागणी करत असल्यामुळे फिर्यादी यांनी सदर बाबत पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर यांचेकडे तक्रारी अर्ज दिला होता.

सदरचा अर्ज पुढील कारवाईकामी खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणे यांचेकडे दिला होता. सदर प्रकरणाची गांभीर्य पाहुन पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर यांनी सदर तक्रारीची तात्काळ दखल घेवून फिर्यादी यांचे अर्जाची सखोल चौकशी करुन अर्ज चौकशीअंती दखलपात्र गुन्हा घडल्याचे निषन्न झाल्याने वरिष्ठांचे आदेशानुसार आरोपी महेश हनमे यांचेविरुध्द दिनांक १८/०५/२०२३ रोजी **चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.२१०/२०२३,भा.द.वि.कलम ३८६,३८७,३४** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यानचे काळामध्ये आरोपी नामे महेश हनमे,रा.सोलापुर दाखल गुन्हयातील फिर्यादी यांना वारंवार फोन करुन पैशाची मागणी करत होता व तात्काळ ५० लाख रुपये घेवुन पाटस परिसरात बोलवित असल्याने मा.अपर पोलीस आयुक्त,श्री.रामनाथ पोकळे व मा.पोलीस उप आयुक्त,श्री.अमोल झेंडे,गुन्हे शाखा यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर यांनी खंडणी विरोधी पथकांची तीन वेगवेगळी पथके तयार करुन नमूद आरोपी शोध घेणेकामी रवाना केले.

त्यावेळी आरोपींनी फिर्यादीस वारंवार लोकेशन बदलुन फोन करुन पाटस परिसरात पैसे घेवुन येण्यास सांगितले. त्यामुळे तीन्ही टीम या पाटस परिसरात आरोपीचा शोध घेत असताना,पोलीस उप-निरीक्षक,श्रीकांत चव्हाण यांच्या टीमला पुणे सोलापूर हायवे लगत पाटस टोलनाक्याच्या पुढे लकी हॉटेलचे जवळ रस्त्याचे कडेला पांढरे रंगाच्या फोर्ड फियस्टा गाडी नंबर एमएच/१४/बीके/४४८४ या गाडी जवळ पाहिजे आरोपी महेश हानमे व एक इसम दिसला असता,

पोलीस उप-निरीक्षक,श्रीकांत चव्हाण व पोलीस अंमलदार,सुरेंद्र जगदाळे यांनी त्या ठिकाणी जावुन स्वतःची ओळख सांगुन कायदेशीर अटकेची कारवाई करत असताना त्यावेळी आरोपी नामे **१)महेश सौदागर हनमे,वय ४७ वर्षे,रा.राजेश्वरी नगर,ब्लॉक नं.११२,बाळे,उत्तर सोलापूर,जि. सोलापुर २)दिनेश सौदागर हनमे,वय ४४ वर्षे,रा.सदर (अटक)** यांनी पोलीस पथकाला दगड फेकुन मारहाण करुन शिवीगाळ धक्का-बुक्की करुन,जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचेकडील फोर्ड फियस्टा गाडी ही अंगावर घालुन अटकेस प्रतिबंध केला.

त्यावेळेस स्वतःचा बचाव करण्यासाठी पोलीस उप-निरीक्षक,श्रीकांत चव्हाण यांनी स्वतःचे सरकारी पिस्टल मधुन गाडीच्या मागील टायरचे दिशेने दोन राऊंड फायर केले. त्यामुळे गाडीचे टायर फुटले त्याचदरम्यान पोलीस उप-निरीक्षक,मोहनदास जाधव व टीम त्याठिकाणी येवुन तेथे उपस्थिती असणा-या स्थानिक लोकांचे मदतीने सदर दोन्ही इसमांना पकडले.

नमुद आरोपी विरुध्द पोलीस अंमलदार,सुरेंद्र जगदाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **यवत पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे गु.र.नं.५१४/२०२३,भादवी कलम ३०७,२२५.३३२,३५३,५०४, ५०६(२),३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद दोन्ही आरोपी हे चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. २१०/२०२३,भा.द.वि.कलम ३८६,३८७,३४ मध्ये पोलीस कस्टडीत असुन नमुद आरोपीनी अशाच प्रकारे अनेक लोकांकडुन खंडणी उकळल्याची शक्यता असुन त्या दृष्टीने अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त, (गुन्हे),श्री.अमोल झेंडे, मा.सहा. पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शानाखाली खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर, सहा.पो.निरीक्षक,चांगदेव सजगणे, पोलीस उप-निरीक्षक,श्रीकांत चव्हाण, मोहनदास जाधव व पोलीस अंमलदार, विजय गुरव, प्रदिप शितोळे, विनोद साळुंके, संग्राम शिनगारे, सुरेंद्र जगदाळे, सैदोबा भोजराव, सचिन अहिवळे, अमोल पिलाने, चेतन आपटे, अनिल मेंगडे, ईश्वर आधंळे राहुल उत्तरकर पवन भोसले, चेतन शिरोळकर, प्रदिप गाडे, किशोर बर्गे, आशा कोळेकर यांनी केलेली आहे.